ePaper

विधान परिषदेसाठी भाजप नेत्यांची मोर्चेबांधणी, पंकजा, हर्षवर्धन पाटील प्रयत्नशील!



| वर्ष - 7 | अंक - 358 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज TM

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 29 जून 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- शफालीचं तडाखेबंद विक्रमी द्विशतक
- माहीच्या 'हेअर स्टाइल'ने वेधले लक्ष
- एनडीए सरकारकडे हीच मागणी
- थरुरांचं दिल्लीतील घर पाण्याखाली

## विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर घोषणांचा पाऊस!

# मायमाऊलींना बळ देणारा अर्थसंकल्प!

### 52 लाख कुटुंबांना वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देणारी 'मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना'

| मुंबई | महाईन्यूज

**राज्याच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्याच दिवशी राज्य सरकारने अर्थसंकल्प सादर केला असून, विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोठ्या घोषणांचा पाऊसच यंदाच्या बजेटमध्ये पाडण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वीचा राज्याचा शेवटचा अर्थसंकल्प शुव्रÂवारी अर्थमंत्री अजित पवार यांनी मांडला. शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, युवक, महिला, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक अशा सर्व घटकांना न्याय; शेती, उद्योग, शिक्षण, व्यापार, आरोग्य, पर्यटन अशा विविध क्षेत्रांच्या विकासाला बळ देणारा वर्ष २०२४-२५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प विधीमंडळात सादर करण्यात आला. महिला वर्गांना खुश करण्याचा प्रयत्न या बजेटमधून करण्यात आला असून, गेल्या २ दिवसांपासून चर्चा होत असलेल्या 'लाडकी बहिण योजनेची' घोषणाही अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर करताना केली.**




तसेच शेतकरी, महिला, युवक आणि सर्व घटकांसाठी महत्त्वाच्या घोषणा यावेळी करण्यात आल्या. शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीक विमा योजना कायम ठेवण्यात आली आहे. तसेच प्रती दिंडी २० हजार रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अर्थसंकल्पात केंद्रीय सशस्त्र दलातील जवानांना व्यवसाय करातून सूट, मुद्रांक शुल्क दंडात कपात, मुद्रांक शुल्क परतावा आदी माध्यमातून दिलासा देण्यात आला आहे.

#### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

राज्यात लेक लाडकी योजनेसह महिलांना आर्थिकदृष्ट्या मदत करण्यात येत आहे. नव्या योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू होत असून, बजेटमध्ये महिलांसाठी विविध योजना सुरू होणार असल्याची घोषणा करण्यात आली. या योजनेंतर्गत राज्यातील २१ ते ६० वर्षांतील महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात येणार आहेत.

#### वारीच्या प्रतिदिंडीस 20 हजार रुपयांचा निधी

संत श्री तुकाराम महाराजांचे नाव घेत अजित पवारांनी अर्थसंकल्पाची सुरुवात केली. मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती पवार यांनी यावेळी दिली. तसेच, वारीसाठी पंढरीकडे प्रस्थान करणाऱ्या नोंदणीकृत दिंड्यांना, प्रतिदिंडी २० हजार रुपयांचा निधी देण्यात येणार आहे.

#### शेतकऱ्यांना वीज बिल माफ

राज्यातील ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला असल्याचे सांगत ई पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू केली आहे. शेतकऱ्यांना १ रुपयांत पीक विमा देण्याची योजना कायम असणार आहे. तर, गाव तिथे गोदाम योजना राबविण्यात येत आहे. जुन्या गोदामांची डागडुजी करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच राज्यातील कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रतीहेक्टर ५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार आहे. राज्यातील शेती कृषी पंपाचे सर्व थकित बील माफ करण्यात आल्याचेही अजित पवारांनी सांगितले.

म

#### मुलींना शिक्षणशुल्क आणि परीक्षा शुल्क माफ

राज्यातील व्यावसायिक शिक्षणात मुलींची संख्या वाढविण्यासाठी सरकार कटिबद्ध असून अभियांत्रिकी, वास्तूशास्र, वैद्यकीय तसेच कृषीविषयक अभ्यासाठी प्रवेशीत ८ लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या इतर मागासवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना शिक्षणशुल्क आणि परीक्षा शुल्क माफ करण्यात येणार आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील २ लाख ५ हजार मुलींना होणार असून २०२४-२५ पासून ही योजना सुरू होत आहे.

#### मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेत 3 सिलेंडर मोफत

अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प मांडताना मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची घोषणा केली. या योजनेतून पात्र कुटुंबाना वर्षाला ३ सिलेंडर मोफत देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितलं.

#### शुभमंगल योजनेचा निधी वाढविला

विवाहित मुलींसाठीच्या शुभमंगल योजनेच्या निधीत वाढ करण्यात आली आहे. या घोषणेंतर्गत आता १० हजारांऐवजी २० हजार रुपये निधी देण्यात येणार असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली. राज्यातील महिलांसाठी १० हजार पिंक रिक्षा देण्यात येतील, तसेच नवीन रुग्णवाहिका खरेदी केल्या जातील, अशी घोषणाही अजित पवारांनी केली.

## पेट्रोल अन् डिझेलचे दर कमी होणार

राज्य सरकार मुंबईसह एमएमआरडीच्या क्षेत्रातील पेट्रोल डिझेलच्या किमतीत कपात करणार आहे. अजित पवार यांनी सादर केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात पेट्रोल व डिझेलवरील मुल्यवर्धित कर राज्यभरात समान करण्याची तरतूद केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक तसेच उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा मिळणार आहे. नवी मुंबई, मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील नागरिक व प्रवाशांना पेट्रोल आणि डिझेलच्या दरात आता सवलत मिळणार आहे. कारण, राज्य सरकारच्या निर्णयामुळे या तिन्ही जिल्ह्याच्या क्षेत्रात पेट्रोल व डिझेलचे दर कमी होणार आहेत. ग्राहकांना पेट्रोलमध्ये प्रति लिटर ६५ पैसे, तर डिझेलमध्ये प्रति लिटर २.७ पैसे रुपये कमी होणार आहेत. पेट्रोल व डिझेलवरील मूल्यवर्धित कर राज्यभरात समान करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रातील डिझेलवरील सध्याचा कर २४ टक्क्यांवरुन २१ टक्के प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच, पेट्रोलचा सध्याचा कर २६ टक्के अधिक प्रति लिटर ५ रुपये १२ पैसे वरुन २५ टक्के अधिक प्रति लिटर ५ रुपये १२ पैसे करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक तसेच उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा मिळणार आहे. या बदलामुळे ठाणे, बृहन्मुंबई आणि नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रातील पेट्रोलचा दर अंदाजे ६५ पैसे व डिझेलचा दर अंदाजे २ रुपये ७ पैसे प्रति लिटर स्वस्त होणार आहे.

# तुकोबांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

## ग्यानबा तुकारामाच्या गजराने देहू दुमदुमून निघाली

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलं आहे. ग्यानबा तुकारामाच्या गजरात अवघा मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. मुख्य मंदिराला प्रदक्षिणा घालताच पालखीचा इनामदार वाड्यात पहिला मुक्काम असेल. तिथं रात्री आरती, मग कीर्तन होईल. लाखोंच्या संख्येने देहूत वारकरी दाखल झाले आहेत.**



लाखो भाविक देहूत दाखल झाले होते. ग्यानबा तुकाराम आणि ज्ञानोबा माऊली तुकारामाच्या गजराने अवघी देहू नगरी दुमदुमून गेली होती. काल पासून देहूत गर्दी झाल्याचं पाहायला मिळालं. इंद्रायणी तिरी वैष्णवांचा मेळा भरला होता.सकाळी इनामदार वाड्यात जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. तिथून टाळ मृदंगच्या गजरात मुख्य मंदिरात पादुका आणण्यात आल्या. काही वेळातच अश्व आणि दिंड्याचे देऊळ वाड्यात आगमन झाले. काल्याचे कीर्तन झाल्यानंतर ठीक पावणे तीनच्या सुमारास तुकोबांच्या पालखीने ग्यानबा तुकारामाच्या गजरात पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले. यावेळी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त होता. चोरीच्या घटना घडू नयेत म्हणून साध्या वेशात पोलीस पोलीस फिरत होते. चोरट्यांवर आणि संशयितांवर पोलोसांची नजर होती.तिथून टाळ मृदंगच्या गजरात मुख्य मंदिरात पादुका आणण्यात आल्या. काही वेळातच अश्व आणि दिंड्याचे देऊळ वाड्यात आगमन झाले. काल्याचे कीर्तन झाल्यानंतर ठीक पावणे तीनच्या सुमारास तुकोबांच्या पालखीने ग्यानबा तुकारामाच्या गजरात पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले.जगतगुरू संत तुकाराम महाजारांचा ३३९ वा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावात पार पडला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक देहूत दाखल झाले होते. ग्यानबा तुकाराम आणि ज्ञानोबा माऊली तुकारामाच्या गजराने अवघी देहू नगरी दुमदुमून गेली होती. काल पासून देहूत गर्दी झाल्याचं पाहायला मिळालं. इंद्रायणी तिरी वैष्णवांचा मेळा भरला होता.सकाळी इनामदार वाड्यात जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. तिथून टाळ मृदंगच्या गजरात मुख्य मंदिरात पादुका आणण्यात आल्या. काही वेळातच अश्व आणि दिंड्याचे देऊळ वाड्यात आगमन झाले. काल्याचे कीर्तन झाल्यानंतर ठीक पावणे तीनच्या सुमारास तुकोबांच्या पालखीने ग्यानबा तुकारामाच्या गजरात पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले. यावेळी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त होता. चोरीच्या घटना घडू नयेत म्हणून साध्या वेशात पोलीस पोलीस फिरत होते. चोरट्यांवर आणि संशयितांवर पोलोसांची नजर होती.तिथून टाळ मृदंगच्या गजरात मुख्य मंदिरात पादुका आणण्यात आल्या. काही वेळातच अश्व आणि दिंड्याचे देऊळ वाड्यात आगमन झाले. काल्याचे कीर्तन झाल्यानंतर ठीक पावणे तीनच्या सुमारास तुकोबांच्या पालखीने ग्यानबा तुकारामाच्या गजरात पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलेग्यानबा तुकारामाच्या गजरात अवघा मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. मुख्य मंदिराला प्रदक्षिणा घालताच पालखीचा इनामदार वाड्यात पहिला मुक्काम असेल. तिथं रात्री आरती, मग कीर्तन होईल. लाखोंच्या संख्येने देहूत वारकरी दाखल झाले आहेत.

### दिंड्याचे देऊळ वाड्यात आगमन


ग्यानबा तुकाराम आणि ज्ञानोबा माऊली तुकारामाच्या गजराने अवघी देहू नगरी दुमदुमून गेली होती. काल पासून देहूत गर्दी झाल्याचं पाहायला मिळालं. इंद्रायणी तिरी वैष्णवांचा मेळा भरला होता. सकाळी इनामदार वाड्यात जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. तिथून टाळ मृदंगच्या गजरात मुख्य मंदिरात पादुका आणण्यात आल्या. काही वेळातच अश्व आणि दिंड्याचे देऊळ वाड्यात आगमन झाले

# माथाडी कायद्याची अंमलबजावणी करा!

## अन्यथा मोर्चा; डॉ. बाबा आढाव यांचा राज्य सरकारला इशारा

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हमाल, कष्टकरी माथाडी कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी. अन्यथा राज्यभरातील कष्टकऱ्यांकडून मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याचा इशारा महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव यांनी दिला.**



महामंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी डॉ. आढाव बोलत होते. मुंबईत चार महिन्यापूर्वी केलेल्या बेमुदत उपोषणावेळी मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या लेखी आश्वासनाची अद्याप पूर्तता झालेली नाही. माथाडी कायद्याची राज्यात अंमलबजावणी न झाल्याने राज्यातील हमाल कष्टकऱ्यांना पुन्हा रस्त्यावर उतरावे लागेल. सरकारने परिणामाना सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, असे डॉ. आढाव यांनी सांगितले.महामंडळाचे सरचिटणीस सुभाष लोमटे, उपाध्यक्ष राजकुमार घायाळ, विकास मगदूम, सहचिटणीस अप्पा खताळ, हनुमंत बहिरट, शिवाजी शिंदे, संतोष नांगरे, गोरख मेंगडे यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते बैठकीस उपस्थित होते. यावेळी जिल्हास्तरीय माथाडी मंडळे शंभर टक्के ठप्प झाली असून, कायदेशीर प्रश्न मार्गी लावले जात नसल्याच्या तक्रारी कार्यकर्त्यांनी बैठकीत केल्या.महामंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी डॉ. आढाव बोलत होते. मुंबईत चार महिन्यापूर्वी केलेल्या बेमुदत उपोषणावेळी मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या लेखी आश्वासनाची अद्याप पूर्तता झालेली नाही. माथाडी कायद्याची राज्यात अंमलबजावणी न झाल्याने राज्यातील हमाल कष्टकऱ्यांना पुन्हा रस्त्यावर उतरावे लागेल. सरकारने परिणामाना सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, असे डॉ. आढाव यांनी सांगितले. महामंडळाचे सरचिटणीस सुभाष लोमटे, उपाध्यक्ष राजकुमार घायाळ, विकास मगदूम, सहचिटणीस अप्पा खताळ, हनुमंत बहिरट, शिवाजी शिंदे, संतोष नांगरे, गोरख मेंगडे यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते बैठकीस उपस्थित होते.

### पुन्हा रस्त्यावर उतरावे लागेल

हमाल, कष्टकरी माथाडी कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी. अन्यथा राज्यभरातील कष्टकऱ्यांकडून मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याचा इशारा महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. बाबा आढाव यांनी दिला.महामंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी डॉ. आढाव बोलत होते.मुंबईत चार महिन्यापूर्वी केलेल्या बेमुदत उपोषणावेळी मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या लेखी आश्वासनाची अद्याप पूर्तता झालेली नाही. माथाडी कायद्याची राज्यात अंमलबजावणी न झाल्याने राज्यातील हमाल कष्टकऱ्यांना पुन्हा रस्त्यावर उतरावे लागेल.

## नागरिकांनी मालमत्ताकरावरील सवलतींचा लाभ घेण्याचे आवाहन

# कर सवलतींचे उरले दोन दिवस!

### नागरिकांच्या सोयीसाठी सुट्टीच्या दिवशीसुद्धा कर संकलन विभागाचे कॅश काउंटर सुरू

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाने मालमत्ताकरावरील विविध सवलतींचा लाभ घेत तब्बल साडेतीन लाखांहून अधिक करदात्यांनी तब्बल ४०० कोटींहून अधिक कराचा भरणा केला आहे. यामध्ये तीन लाख २५ हजार नागरिकांना आपला चालू आर्थिक वर्षाचा मालमत्ताकर भरून थकीत कराचासुद्धा भरणा केला आहे.**




#### सुट्टीच्या दिवशीसुद्धा कॅश काउंटर आहेत सुरू..

मालमत्ताकरावरील सवलतींचा शनिवार, २९ जून व रविवार, ३० जून रोजी सुट्टीच्या दिवशीसुद्धा कॅश काउंटर सुरू ठेवण्यात आले आहेत. सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.०० पर्यंत कॅश काउंटर सुरू असणार आहेत. नागरिकांनी मालमत्ताकरावरील सवलतींची संधी चुकवू नये, असे आवाहन करसंकलन विभागाकडून करण्यात आले आहे.

करसंकलन विभागाने आवाहन केल्यानुसार, नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने कर भरून तब्बल २८५ कोटींचा ऑनलाइन पद्धतीने कर भरला आहे. आता मालमत्ताकरावरील सवलतींचे अवघे दोनच दिवस बाकी असून नागरिकांनी मालमत्ताकरावरील सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन करसंकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे.

#### अशा आहेत सवलती...

१) ३० जूनपूर्वी मालमत्ताकराची रक्कम ऑनलाइन स्वरूपात भरल्यास १० टक्के

२) फक्त महिलांच्या नावे असलेल्या एका निवासी मालमत्तेच्या सामान्य करावर ३० टक्के

३) पर्यावरणपूरक इमारती/सोसायट्यांसाठी,

– कंपोस्टिंग यंत्रणा, एसटीपी प्लांट, झिरो वेस्ट, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सौरऊर्जा संकल्पना राबविणाऱ्या इमारतींमधील निवासी मालमत्तांना ५ ते १० टक्के

– ग्रीन बिल्डिंग रेटिंगमध्ये ३ ते ५ रेटिंग असणाऱ्या मालमत्तांना ५ ते १५ टक्के

---

## महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेला जागतिक ओळख देणारा अर्थसंकल्प

### भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले अर्थसंकल्पाचे स्वागत

#### महिला, शेतकरी, युवक, दुर्बल घटकाला समर्पित अर्थसंकल्प

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशातील गरीब, महिला, शेतकरी आणि युवा या चार जातींच्या सर्वांगीण विकासासाठी आणि विकासाचे लाभ या वर्गातील अखेरच्या स्तरापर्यंत पोहोचविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या संकल्पास पुरेपूर पाठबळ देऊन सरकारसोबत राहण्याची ग्वाही देणारा अर्थसंकल्प सादर करून महाराष्ट्राने देशाच्या विकासाच्या वाटचालीत आपला सहभाग स्पष्ट केला आहे. अशा शब्दांत भारतीय जनता पार्टीचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी महायुती सरकारच्या अर्थसंकल्पाचे स्वागत केले.**



> एका बाजूला सर्वांगीण सामाजिक विकासासोबतच पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता आखलेल्या योजनांमुळे विकासाच्या वाटचालीचा वेग वाढला असून मुंबई महानगर क्षेत्रातील तसेच ग्रामीण विकासाच्या विविध योजना राज्याच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या ठरणार आहेत या शब्दात त्यांनी अर्थसंकल्पाचे वर्णन केले. हजार वर्षांची परंपरा असलेली पंढरीची वारी, कोकणातील कातळशिल्पे, दहिहंडी उत्सव आणि गणेशोत्सवासोबतच शिवकालीन १२ किल्ल्यांना जागतिक वारसा नामांकन मिळविण्याच्या सरकारच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्राच्या ऐतिहासिक व सामाजिक परंपरेला जागतिक प्रतिष्ठा मिळणार आहे.
>
> **-शंकर जगताप,** भाजपा शहराध्यक्ष



> महायुती सरकारच्या माध्यमातून सादर झालेला अंतरिम अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने महिला, युवक, शेतकरी यांचा सन्मान करुन त्यांना बळ देणारा आहे. वारकरी संप्रदाय महामंडळाची स्थापना, प्रति दिंडी २० हजार रुपयांचा निधी, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, शेतकऱ्यांना मोफत वीज, गृहिणींना वर्षाला ३ सिलिंडर मोफत असे अध्यात्म आणि वारकरी आणि भारतीय संविधानानुसार सर्व तळागाळातील घटकांच्या विकासाचा विचार जपणारा हा अर्थसंकल्प आहे. महाराष्ट्राला प्रगती आणि विकासाच्या पथवर अग्रेसर होण्यासाठी बळ देणाऱ्या या अर्थसंकल्पाचे तमाम पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने स्वागत करतो.
>
> **– महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

शेतकऱ्यांना समस्यामुक्तीसाठी भरघोस मदतीची हमी देतानाच सौरउर्जा पंप देण्याची महायुती सरकारची घोषणा राज्याच्या कृषी क्षेत्रास संजीवनी देणारी ठरणार आहे. मागेल त्याला सौरऊर्जा पंप आणि अखंडित वीजपुरवठ्याची हमी देणाऱ्या सरकारच्या या योजनेमुळे तसेच मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेमुळे समस्याग्रस्त शेतकऱ्यास मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यातील ४४ लाख सहा हजार शेतकऱ्यांना या योजनेमुळे साडेसात अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना मोफत वीज पुरविली जाणार असल्याने, हवामानबदलामुळे किंवा नैसर्गिक आपत्तींमुळे आर्थिक विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्यास मदतीचा हात मिळाला आहे असेही त्यांनी नमूद केले.

शंकर जगताप म्हणाले की, राज्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून महायुती सरकार राबवत असलेल्या मोहिमेस वेग येणार असून नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या ६१ प्रकल्पांमुळे येत्या दोन वर्षांतच सिंचनाखालील क्षेत्रात साडेतील लाख हेक्टरहून अधिक शेतजमिनीची भर पडणार आहे. नदीजोड प्रकल्प, गाळयुक्त आणि जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण या महत्वाकांक्षी कार्यक्रमास महाविकास आघाडी सरकारने खोडा घातला होता. आता या कार्यक्रमास गती मिळणार असल्याने, शेतजमिनीला सुपीकतेचे वरदान लाभणार आहे असेही ते म्हणाले.

युवक, महिला, दुर्बल घटक, उपेक्षित, आदिवासी, बेरोजगार, विद्यार्थी, श्रमजीवी, कामगार, नोकरदार, अशा सर्व घटकांच्या जीवनशैलीत थेट सुधारणा घडवून आणणाऱ्या अनेक योजना सरकारने जाहीर केल्या असून शिक्षण, आरोग्य, उद्योग, पायाभूत सुविधा, अशा अनेक क्षेत्रांत विकासाचे नवे वारे वाहणार आहेत. गरीब कुटुंबातील महिला आणि तरुणींना प्रत्येक महिन्याला 1500 रुपये देणारी माझी लाडकी बहिण या योजनेमुळे महिलांना आर्थिक पाठबळ लाभणार आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, शबरी आदिवासी विकास महामंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, शामराव पेजे आर्थिक विकास महामंडळ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, संत शिरोमणी गोरोबाकाका मातीकला मंडळ, टॅक्सी-रिक्षाचालक कल्याणकारी महामंडळ अशा महामंडळांमार्फत विविध समाजघटकांच्या उन्नतीकरिता राज्य सरकार विशेष योजना आखत असते.




# नवे फौजदारी कायदे येतील

**देशात १ जुलैपासून 'भारतीय न्याय संहिता', 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' आणि 'भारतीय साक्ष्य अधिनियम' हे नवे फौजदारी कायदे लागू होणार आहेत. ही नवी फौजदारी न्याय व्यवस्था प्रत्यक्ष राबवण्यास कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा, सरकारी अधिकारी तयार आहेत का, हा प्रश्न आहे.**

केंद्र सरकारने अलीकडेच, या कायद्यांचा समावेश सरकारी यंत्रणांनी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या सेवा-प्रशिक्षणात करावा, असा सल्ला राज्य सरकारांसह सर्व संबंधितांना दिलेला आहे. भारतीय दंड संहितेत ५११ कलमे आहेत, त्याऐवजी आता ३५८ कलमे असलेली 'भारतीय न्याय संहिता' लागू होणार आहे. त्यात २० नव्या प्रकारच्या गुन्ह्यांचा समावेश आणि ३३ गुन्ह्यांच्या शिक्षेत बदल करण्यात आलेला आहे. 'महिला आणि बालके यांच्यासंबंधीचे गुन्हे' असे नवे प्रकरण नव्या संहितेत समाविष्ट आहेच, शिवाय दहशतवाद, झुंडबळी, संघटित गुन्हेगारी, वंश/ जात वा सामाजिक शत्रुत्वातून केले जाणारे गुन्हे यांचाही स्पष्ट उल्लेख नव्याने झालेला आहे. 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' ही 'फौजदारी प्रक्रिया कायदा' (क्रिमिनल प्रोसीजर कोड) ऐवजी लागू होणार असून त्यातील कलमे मात्र पूर्वीच्या ४८४ ऐवजी आता ५३१ आहेत. यात दोन नवीन प्रकरणांची भर पडल्याने एकूण प्रकरणांची



संख्या ३९ गेली असून यांपैकी एकंदर ३५ कलमांनुसार, गुन्हे-तपासाला कालमर्यादा घालण्यात आलेली आहे. दूरसंवादासारख्या (ऑडिओ/ व्हीडिओ) तंत्रज्ञानाचा उल्लेख यात आहे. 'भारतीय साक्ष्य अधिनियम' मध्ये विद्यमान 'पुरावा कायद्या'तील १६७ ऐवजी १७० कलमे आहेत. यापैकी २४ तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.कोणत्याही कायद्याचा खरा कस लागतो तो त्याच्या अंमलबजावणीतच. मुळात आपली एकंदर फौजदारी न्याय व्यवस्था (पोलीस वा अन्य तपासयंत्रणा, न्यायदान यंत्रणा आणि तुरुंगयंत्रणा ) आधीच खूप ओढगस्तीत कार्यरत असताना, नवीन कायदे विकसित आणि परिपक्व होण्यासाठी काही वर्षे लागतील. भारतीय दंड संहिता आणि इतर कायद्यांच्या बाबतीतही असेच घडले होते; पण ते ब्रिटिशांच्या काळात! इथे ते कायदे रुजल्यानंतर, विकसित झाल्यानंतर नवे कायदे आणले जात आहेत आणि देशभर पुरेशी प्रशिक्षणसत्रे घेतल्याविना तसेच पुरेशा संख्येने मनुष्यबळ असल्याविनाच अमलातही येत आहेत. जेव्हा जिल्ह्याजिल्ह्यांतील न्यायालयांत हे कायदे अर्थ लावण्यासाठी (खटल्यांद्वारे) येतील तेव्हा खरी परीक्षा सुरू होईल. ही आव्हाने व्यापक प्रशिक्षणाची निकड आणि महत्त्व अधोरेखित करतात. 'इंडिया जस्टिस रिपोर्ट-२०२२' नुसार, भारताच्या पोलीस दलांतील एकंदर मनुष्यबळ २० लाख ९४ हजार आहे. पोलीस अधिकाऱ्यांसाठी केवळ २११ प्रशिक्षण संस्था आहेत. राज्याराज्यांतील पोलीस दले आणि त्यांतील प्रशिक्षणसंस्था यांचे प्रमाण निरनिराळे असले तरी, देशभरात एकंदर पाहाता सरासरी प्रत्येक संस्थेने १२,७४४ व्यक्तींना प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. पोलिसांसाठी जी काही आर्थिक तरतूद असते, तिच्या केवळ १.३ टक्के रक्कम प्रशिक्षणाला मिळते, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्याही रकमेपैकी सरासरीने केवळ ८४ टक्केच रकमेचा वापर झाला आहे. पोलिस प्रशिक्षणासाठी तरतूद तुटपुंजी ठरतेच, शिवाय आणखी एक समस्या म्हणजे प्रशिक्षणासाठी एकावेळी किती कर्मचाऱ्यांना पाठवणार, हा राज्यांपुढला प्रश्न. तो थेटच मनुष्यबळ-संख्येशी निगडित आहे. याच अहवालात मंजूर पदे आणि वास्तविक संख्या यांच्यात तब्बल २२.१ टक्के तफावत असल्याचा उल्लेख आहे. तंत्रज्ञानाचा वापर आणि पोलिस दलाच्या आधुनिकीकरणातून हा प्रश्न सोडवता आला असता. तथापि, केवळ दोनच (तुलनेने लहान) राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशानेच (गुजरात, अरुणाचल प्रदेश आणि पुद्दुचेरी) पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केलेली तरतूद पूर्णपणे वापरली आहे.राज्यांच्या तुरुंग व्यवस्थेतील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्याच्या क्षमतेबाबतही प्रश्न आहेतच. देशभरात तुरुंग- कर्मचाऱ्यांची मोठी कमतरता आहे. हे आदर्श प्रमाण साध्य करण्यासाठी २,७७० पदांची आवश्यकता असताना, देशभरात केवळ १,३९१ पदांना 'मंजुरी देण्यात आली' आहे आणि त्याहीपैकी केवळ ८८६ पदेच प्रत्यक्ष भरण्यात आली आहेत.

## प्रासंगिक »

### ...तेथे आरोग्य


***लॅन्सेट'च्या या अहवालातून पुढे या आकडेवारीकडे आपण डोळे उघडून पाहायला तयार आहोत का?***

या आकडेवारीच्याच भाषेत बोलायचे तर भारतातील निम्मे प्रौढ लोक व्यायामबियाम करणे फारसे आवश्यक मानत नाहीत.भारतासह सगळ्याच आशिया पॅसिफिक आणि दक्षिण आशियाई देशांमध्ये ही परिस्थिती आहे. पण त्यातही भारतात ती गंभीर मानण्याचे कारण म्हणजे आपली लोकसंख्या. ५० टक्के प्रौढ लोकसंख्या शारीरिक पातळीवर तंदुरुस्ती राखणे आवश्यक मानत नसेल, त्या दृष्टीने आवश्यक त्या गोष्टी करत नसेल, तर स्थूलत्व, मधुमेह, हृदयविकार हे जीवनशैलीच्या परिणामी होणारे आजार लाल गालिचा अंथरून उभेच असणार. हे आणि असे आजार, त्यांच्यामुळे कमी होणारी शारीरिक क्षमता, मनुष्यबळावर त्याचा होणारा परिणाम, जीवितहानी, औषधोपचारांवर होणारा खर्च हे सगळे पाहिले तर स्वतःच्या तंदुरुस्तीसाठी रोजच्या २४ तासांमधली किमान ४५ मिनिटेही बाजूला न काढणे हे आपल्याच नाही तर देशाच्या दृष्टीनेही घातक ठरते.

चारच ओळी. पण त्यांच्यामधून ढगांबद्दलच्या कल्पना, काव्य, परंपरा, विज्ञान या सगळ्यांचे दर्शन कवीने घडवून आणले आहे. नानाविध आकारांचे व क्षणभंगुर वाटणारे ढग हा कल्पना, चित्रे, काव्य यांचा खास विषय. हजारो वर्षांपासून माणूस आकाश आणि त्यात स्वैर विहार करणाऱ्या ढगांकडे पाहात आला आहे.

# ये रे घना, ये रे घना...!

भारतात तर आकाशातील ढगाकडे पाहत पावसाची आळवणी करणे, हेच आपले पिढीजात प्राक्तन राहिले. पण युगानुयुगे ढगांकडे आतुरपणे पाहूनही ढग हा आपल्या अभ्यासाचा, शास्त्राचा विषय कधी झाला नाही. तसे पाचव्या सहाव्या शतकात वराहमिहिरांनी आपल्या बृहत्संहिता या ग्रंथात ढगांचे चार प्रकार सांगितले. त्यांची नावे आवर्तक, संवर्तक, पुष्कर आणि द्रोण. या पैकी कोणत्या प्रकारच्या ढगात सूर्यकिरणांकडून 'गर्भधारणा' झाल्यास किती पाऊस पडतो, हे सांगण्यासाठी त्यांनी हे प्रकार दिलेले आहेत. पण या प्रकारांचे नेमके व वस्तुनिष्ठ वर्णन मात्र नाही. 'सूर्यकिरणांकडून गर्भधारणा होऊन पाऊस पडणे' ही कवीकल्पना मुळात वाल्मीकींनी रामायणात वापरलेली होती.अव्याहत यदृच्छ रूपे बदलणाऱ्या तरल ढगांना विज्ञानाच्या चौकटीत बसवणे म्हणजे वाफेला ओंजळीत धरण्याचा प्रयत्न. पण ती किमया करून दाखवली इंग्लंडचे ल्युक होवार्ड यांनी. त्यांनी सर्वप्रथम



ढगांचे वर्गीकरण केले. केवळ हौस म्हणून केलेल्या अभ्यासातून एखादा माणूस शास्त्रात केवढी क्रांती घडवून आणू शकतो, याचे होवार्ड हे एक उदाहरण होते. त्यांचा जन्म २८ नोव्हेंबर १७७२ रोजी लंडनमध्ये झाला. बालपणासून त्यांना विज्ञानात रस आणि निसर्ग व हवामानशास्त्राचे आकर्षण होते. आपल्या घरात त्यांनी एक प्रयोगशाळाही उभी केली. काही काळ त्यांनी परागकणांवरही संशोधन केले. खरे तर त्यांचा पोटापाण्याचा व्यवसाय औषधीनिर्माण उद्योगासाठी रसायने पुरवणे हा होता. पण त्यांचे लक्ष मात्र सदैव आकाशातील वारे, तापमान, पर्जन्य, ढग यांच्याकडे असे. विविध उपकरणांतून ते हवामानाच्या नोंदी घेत व त्यांचे विश्लेषण करीत. निष्ठेने एखादे व्रत पाळावे तशा त्यांनी ४० वर्षे नोंदी घेतल्या. आकाश, त्याचे रंगरूप, ढग त्यांचे रंग, आकार इ. ते सातत्याने नोंदवत होते. त्यांनी जी निरीक्षणे केली, वर्णने लिहिली, रेखाटने काढली, त्यातून हजारो वर्षे जे कुणाच्याच हाती लागले नाही, ते रहस्यसूत्र त्यांच्या हाती लागले. ते होते ढगांच्या वर्गीकरणाचे सूत्र. १८०३ मध्ये एका शोधनिबंधातून त्यांनी ढगांचे हे वर्गीकरण प्रकाशित केले. होवार्ड यांनी ढगांचे मुख्य तीन प्रकार पाडले. थर असलेले स्तरित किंवा STRATUS CLOUDS, ढिगाऱ्यासारखे संचयी किंवा CUMULUS CLOUDS आणि दोऱ्यासारखे तंतुमेघ किंवा CIRRUS CLOUDS. या तीन मूळ प्रकारांच्या मधल्या अवस्थांनाही त्यांनी स्तरित तंतुमेघ, संचयी तंतुमेघ इ. नावे देऊन त्यांचे वर्ग पाडले. होवार्ड यांच्या निबंधात ढगांची अनेक रेखाटने व रंगीत चित्रेही होती. पुढेही त्यांनी बरेच हवामानशास्त्रीय संशोधन केले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# तुका म्हणे बरा। लाभ काय तो विचारा।।

## शेतकरी, महिला, तरुणांसाठी आकर्षक योजना

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शेतकरी, महिला, विद्यार्थी अशा सर्वच घटकांवर विविध सवलती आणि अनुदानांच्या योजनांचा वर्षाव करणारा अतिरिक्त अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी सादर केला. मात्र, एक लाख दहा हजार कोटींची वित्तीय तूट, २० हजार कोटींची महसुली तूट असताना या सर्व योजनांसाठी आणखी एक लाख कोटींचा बोजा सरकारवर पडणार आहे. त्यासाठी निधी कुठून मिळणार, याचे उत्तर संकल्पात नाही.असून त्यामुळेच की काय, विकासकामांसाठीच्या तरतुदीला अर्थसंकल्पात कात्री लावण्यात आली आहे.**

विधिमंडळाच्या अधिवेशनात अर्थमंत्री या नात्याने वैयक्तिक दहावा अर्थसंकल्प सादर करताना अजित पवार यांनी भाषणाची सुरुवात आणि शेवट जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाच्या ओळींनी केली. आषाढी वारीनिमित्त तुकाराम महाराजांची पालखी देहूतून प्रस्थान ठेवत असतानाच, विधिमंडळातील भाषणात अजितदादांनी 'तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा, तरी माझ्या दैवा, पार नाही' असे बोलून दाखवले. मात्र, सवलतींचा वर्षाव करणाऱ्या या 'सेवे'मागचे आर्थिक गणित न उलगडल्याने 'तुका म्हणे बरा। लाभ काय तो विचारा।।' असा तुकारामाचा प्रश्न या अर्थसंकल्पाबाबत उपस्थित होईल.लोकसभा निवडणुकीतील पराभवामुळे हादरलेल्या महायुतीच्या नेत्यांनी आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून विविध समाज घटकांवर सवलतींचा वर्षाव केला आहे. यातून सत्ताधारी पक्षांबद्दलची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी मोफत वीज, २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये देणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना', इतर मागासवर्गीय किंवा आर्थिकदृष्ट्या



दुर्बल घटकांतील विद्यार्थिनींना शैक्षणिक शुल्कमाफी, दारिद्र्य रेषेखालील पात्र कुटुंबाना दरवर्षी तीन सिलिंडर मोफत, विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन या नवीन योजना विधानसभा निवडणुकीतील प्रचारात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. अपेक्षेप्रमाणे कोणतीही करवाढ अर्थमंत्र्यांनी केलेली नाही. त्याचवेळी मुंबई, ठाणे, नवी मुंबईत पेट्रोल, डिझेलवरील करात कपात करून या शहरांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.भांडवली म्हणजेच विकास कामांवर एकूण खर्चाच्या १३ टक्के रक्कम खर्च करण्यात येणार आहे. पण २०२३-२४ या आर्थिक वर्षात सुधारित अर्थसंकल्पात विकास कामांवर ९४ हजार ८५० कोटींची तरतूद करण्यात आली होती. पुढील वर्षाच्या अतिरिक्त अर्थसंकल्पात ९२,७७९ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याकरिता दरवर्षी ५० हजार युवकांना कार्यप्रशिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेचा ऊहापोह करण्यात आलेला नसला तरी सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांची सोय लावण्याचा हा प्रकार असल्याची कुजबूज मंत्रालयात होती. या योजनेत पैसे किती देणार याचा उल्लेख नसला तरी विद्यावेतनाएवढेच १० हजार रुपये दिले जाण्याची शक्यता आहे. मुंबई, नवी मुंबई व ठाण्यातील डिझेलवरील सध्याच्या २४ टक्क्यांचा कर तीन टक्क्यांनी कमी करून २१ टक्के करण्याचा तसेच पेट्रोलवरील कर २६ टक्क्यांवरून २५ टक्के करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. यामुळे मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील पेट्रोल प्रति लिटरला ६५ पैसे तर डिझेल दोन रुपये सात पैशांनी स्वस्त होईल, असे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले.योजना राबवण्यात येणार आहे. २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये भता दिला जाईल. मात्र, त्यामध्ये कुटुंबाच्या उत्पन्नमर्यादेची अट ठेवण्यात आली आहे.विधिमंडळाच्या अधिवेशनात अर्थमंत्री या नात्याने वैयक्तिक दहावा अर्थसंकल्प सादर करताना अजित पवार यांनी भाषणाची सुरुवात आणि शेवट जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाच्या ओळींनी केली. आषाढी वारीनिमित्त तुकाराम महाराजांची पालखी देहूतून प्रस्थान ठेवत असतानाच, विधिमंडळातील भाषणात अजितदादांनी 'तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा, तरी माझ्या दैवा, पार नाही' असे बोलून दाखवले. मात्र, सवलतींचा वर्षाव करणाऱ्या या 'सेवे'मागचे आर्थिक गणित न उलगडल्याने 'तुका म्हणे बरा। लाभ काय तो विचारा।।' असा तुकारामाचा प्रश्न या अर्थसंकल्पाबाबत उपस्थित होईल.

### 92,779 कोटींची तरतूद

लोकसभा निवडणुकीतील पराभवामुळे हादरलेल्या महायुतीच्या नेत्यांनी आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून विविध समाज घटकांवर सवलतींचा वर्षाव केला आहे. यातून सत्ताधारी पक्षांबद्दलची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी मोफत वीज, २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये देणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना', इतर मागासवर्गीय किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थिनींना शैक्षणिक शुल्कमाफी, दारिद्र्य रेषेखालील पात्र कुटुंबाना दरवर्षी तीन सिलिंडर मोफत, विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन या नवीन योजना विधानसभा निवडणुकीतील प्रचारात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. अपेक्षेप्रमाणे कोणतीही करवाढ अर्थमंत्र्यांनी केलेली नाही. त्याचवेळी मुंबई, ठाणे, नवी मुंबईत पेट्रोल, डिझेलवरील करात कपात करून या शहरांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.भांडवली म्हणजेच विकास कामांवर एकूण खर्चाच्या १३ टक्के रक्कम खर्च करण्यात येणार आहे. पण २०२३-२४ या आर्थिक वर्षात सुधारित अर्थसंकल्पात विकास कामांवर ९४ हजार ८५० कोटींची तरतूद करण्यात आली होती. पुढील वर्षाच्या अतिरिक्त अर्थसंकल्पात ९२,७७९ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

# मनोज जरांगेंना भुजबळ नावाची कावीळ!

## सगे सोयऱ्यांची अंमलबजावणी झालीच पाहिजे : जरांगें

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मनोज जरांगेंना भुजबळ नावाची कावीळ झाली आहे अशी बोचरी टीका ओबीसी समाजासाठी लढा उभा करणारे आंदोलक लक्ष्मण हाके यांनी केली आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा दिवसेंदिवस तापतो आहे.**

कारण सगे सोयऱ्यांची अंमलबजावणी झालीच पाहिजे त्यासह आरक्षण मिळालं पाहिजे या मागणीसाठी मनोज जरांगेंनी आंदोलन सुरु केलं आहे. त्यांनी या मागणीच्या अंमलबजावणीसाठी सरकारला १३ जुलैपर्यंतची मुदत दिली आहे. दुसरीकडे ओबीसी बांधवांवर अन्याय होता कामा नये अशी भूमिका घेत लक्ष्मण हाकेंनीही उपोषण आंदोलन सुरु केलं होतं. सरकारच्या आश्वासनानंतर त्यांनी ते मागे घेतलं. आता लक्ष्मण हाकेंनी पुन्हा एकदा मनोज जरांगेंवर टीका केली.छगनभाऊ, तुला असा इंगा दाखवतो, तू आमच्या आमच्यात काडी लावतो का? मी तुझ्यापेक्षा जास्त पुढचा आहे. तू बळच रक्त





जाळतो आहेस. बेट्या तुझा टांगा उलटवणार. तू जेवढं करशील तेवढा मराठा एक होत जाईल." असं म्हणत भुजबळांवर मनोज जरांगेंनी पुन्हा टीका केली आहे. "कोणता तरी नेता सांगतोय म्हणून आपण बिघडायचं आणि रोष व्यक्त करायचा. आपल्याला एकमेकांचे चेहरे बघायचे आहेत, रामराम घालायचा आहे, शेतात एकमेकांना काही अडचण आली तर मदतीला जायचं आहे याच भूमिकेत आपल्याला राहायचं आहे. हे विसरु नका." असं जरांगे म्हणाले होते. आता लक्ष्मण हाकेंनी त्यांना जोरदार उत्तर दिलंय.मातेरी गावात डीजे वाजवण्यावरुन दगडफेक झाल्याची माहिती कळली आहे. हा प्रकार घडवून आणला गेला आहे अशी शंका दिसते. ओबीसी आंदोलनसाठीही छगन भुजबळांना माझंच गाव सापडलं का? आंतरवली सराटीत माझ्याच आंदोलनापुढे आंदोलन करायला लावलं. आमचा आंदोलनाला विरोध नाही.

### काहीही झालं तर भुजबळ यांचंच चित्र

पण दंगल झाली पाहिजे, जातींमध्ये तेढ निर्माण झाली पाहिजे असा यामागचा हेतू. छगन भुजबळांना दगडफेक करण्याचा नाद आहे. त्यातून हे घडवलं गेलं." असा आरोप मनोज जरांगेंनी केला. ज्यानंतर मनोज जरांगेंनी चांगल्या डॉक्टरला दाखवून घ्यावं असं म्हणत लक्ष्मण हाकेंनी टोलेबाजी केली.मनोज जरांगेंना भुजबळ नावाची कावीळ झाली आहे. त्यामुळे कुठेही काहीही झालं तर त्यांना छगन भुजबळ यांचंच चित्र दिसतं.

# सूड भावनेने कारवाई करू नये!

## एनडीए सरकारकडे हीच मागणी : शरद पवार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना झारखंड उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. आंचल जमीन घोटाळ्या प्रकरणी त्यांना ईडीने अटक केली होती. या प्रकरणाची सुनावणी १३ जून रोजी पूर्ण झाली होती. मात्र, न्यायालयाने त्याचा निर्णय राखून ठेवला होता. आज उच्च न्यायालयाने यासंदर्भातील निकाल जाहीर केला. दरम्यान, हेमंत सोरेन यांना जामीन मिळाल्यानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे.**





झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना राजकीयदृष्ट्या प्रेरित खटल्यात तुरुंगवास भोगावा लागला असून १४९ दिवसांच्या लढ्याला आज न्यायाचा मार्ग मिळाला आहे. सोरेन यांना न्यायालयाने दिलेल्या जामीनामुळे सत्याचा विजय हा जास्त दूर नाही अशी भावना दृढ झाली आहे, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली.

पुढे बोलताना त्यांनी केंद्रातील एनडीए सरकारला सूड भावनेने कारवाई करू नये, असं आवाहनही केलं. एनडीए सरकारकडे आमची मागणी राहील, की सूड भावनेने कोणतीही कारवाई न होता संविधानानुसार लोकशाहीची भरभराट होईल अशी कामगिरी करावी, असे ते म्हणाले.ईडीने रांचीमध्ये लष्कराच्या ताब्यात असलेल्या ४.५५ एकर जमिनीच्या बेकायदेशीर खरेदी-विक्रीची चौकशी सुरू केली होती. या प्रकरणी ईडीनं रांचीच्या बडागाईन झोनचे महसूल उपनिरीक्षक भानू प्रताप प्रसाद यांना अटक केली होती. त्यांच्या राहत्या घरातून मोठ्या प्रमाणात सरकारी कागदपत्रं आणि मोबाईलही त्यावेळी जप्त करण्यात आले होते. त्यानंतर ईडीने आपला मोर्चा हेमंत सोरेन यांच्याकडे वळवला होता.प्रदीप बागची, विष्णू कुमार अग्रवाल, भानू प्रताप प्रसाद आणि इतरांविरुद्ध झारखंड पोलीस आणि पश्चिम बंगाल पोलिसांनी दाखल केलेल्या अनेक एफआयआरच्या आधारे ईडीनं मनी लॉन्ड्रिंग कायद्याच्या कलमांखाली गुन्हा नोंदवला होता. या प्रकरणाचा तपास पुढे जात असताना ईडीनं १४ आरोपींना अटक केली होती. या आरोपींनी सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमतानं भूमाफियांच्या नावे फसवणूक करून भूखंड हस्तांतरित केल्याचं तपासात उघड झालं होतं. झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना राजकीयदृष्ट्या प्रेरित खटल्यात तुरुंगवास भोगावा लागला असून १४९ दिवसांच्या लढ्याला आज न्यायाचा मार्ग मिळाला आहे. सोरेन यांना न्यायालयाने दिलेल्या जामीनामुळे सत्याचा विजय हा जास्त दूर नाही अशी भावना दृढ झाली आहे, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली. पुढे बोलताना त्यांनी केंद्रातील एनडीए सरकारला सूड भावनेने कारवाई करू नये, असं आवाहनही केलं. एनडीए सरकारकडे आमची मागणी राहील, की सूड भावनेने कोणतीही कारवाई न होता संविधानानुसार लोकशाहीची भरभराट होईल अशी कामगिरी करावी, असे ते म्हणाले.ईडीने रांचीमध्ये लष्कराच्या ताब्यात असलेल्या ४.५५ एकर जमिनीच्या बेकायदेशीर खरेदी-विक्रीची चौकशी सुरू केली होती. या प्रकरणी ईडीनं रांचीच्या बडागाईन झोनचे महसूल उपनिरीक्षक भानू प्रताप प्रसाद यांना अटक केली होती. त्यांच्या राहत्या घरातून मोठ्या प्रमाणात सरकारी कागदपत्रं आणि मोबाईलही त्यावेळी जप्त करण्यात आले होते. त्यानंतर ईडीने आपला मोर्चा हेमंत सोरेन यांच्याकडे वळवला होताबंगाल पोलिसांनी दाखल केलेल्या अनेक एफआयआरच्या आधारे ईडीनं मनी लॉन्ड्रिंग कायद्याच्या कलमांखाली गुन्हा नोंदवला होता.

### काय म्हणाले शरद पवार?

या प्रकरणाचा तपास पुढे जात असताना ईडीनं १४ आरोपींना अटक केली होती. या आरोपींनी सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमतानं भूमाफियांच्या नावे फसवणूक करून भूखंड हस्तांतरित केल्याचं तपासात उघड झालं होतं.झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना झारखंड उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. आंचल जमीन घोटाळ्या प्रकरणी त्यांना ईडीने अटक केली होती. या प्रकरणाची सुनावणी १३ जून रोजी पूर्ण झाली होती. मात्र, न्यायालयाने त्याचा निर्णय राखून ठेवला होता. आज उच्च न्यायालयाने यासंदर्भातील निकाल जाहीर केला. दरम्यान, हेमंत सोरेन यांना जामीन मिळाल्यानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना राजकीयदृष्ट्या प्रेरित खटल्यात तुरुंगवास भोगावा लागला असून १४९ दिवसांच्या लढ्याला आज न्यायाचा मार्ग मिळाला आहे. सोरेन यांना न्यायालयाने दिलेल्या जामीनामुळे सत्याचा विजय हा जास्त दूर नाही अशी भावना दृढ झाली आहे, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली.पुढे बोलताना त्यांनी केंद्रातील एनडीए सरकारला सूड भावनेने कारवाई करू नये, असं आवाहनही केलं. एनडीए सरकारकडे आमची मागणी राहील.

# शशी थरूरांचं दिल्लीतील घर पाण्याखाली

## पावसामुळे सकाळी दिल्लीतील घरातही पाणी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**दिल्लीत आज ( शुक्रवार २८ जून ) सकाळी मुसळधार पाऊस झाला असून या पावसामुळे येथील जनजीवन विस्कळीत झालं आहे. सध्या पावसाने उसंत घेतली असली तरी अजूनही अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचले आहे. दरम्यान, या पावसाचा फटका काँग्रेस नेते शशी थरूर यांनादेखील बसला आहे. या पावसामुळे आज सकाळी त्यांच्या दिल्लीतील घरातही पाणी साचलं.**



शशी थरूर यांनी एक्स या सोशल मीडिया साईट व्हिडीओ पोस्ट करत यासंदर्भात माहिती दिली. माझे 'ल्युटन्स' दिल्लीतील घर पूर्णपणे पाण्याखाली गेलं आहे. मी आज सकाळी झोपेतून उठलो तेव्हा संपूर्ण घरात पाणी शिरलं होतं. या पाण्यामुळे बेड आणि सोफ्यासह जमिनीवर असणाऱ्या प्रत्येक गोष्टींचं नुकसान झालं, असं शशी थरूर म्हणाले.पुढे बोलताना, दिल्लीत झालेल्या मुसळधार पावसामुळे शेजारच्या नाल्यांमध्ये पाणी तुंबलं असून हे पाणी वाहून जाण्यासाठी कुठेही जागा नाही, असंही त्यांनी सांगितले. तसेच लोकांना वीजेचा धक्का लागू नये, यासाठी सकाळी ६ वाजतापासून वीज बंद करण्यात आली होती, असेही ते म्हणाले. याशिवाय आज संसदेत पोहोचण्यासाठी मला थेट बोटीने प्रवास करावा लागला असता. मात्र, साचलेलं पाणी काढण्याचं काम युद्धपातळीवर झालं, त्यामुळे मी वेळेवर संसदेत पोहोचलो, असंही त्यांनी सांगितलं.दरम्यान, आज झालेल्या पावसानंतर दिल्ली सरकारकडून आज दुपारी उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली. याशिवाय नायब उपराज्यपाल वी.के. सक्सेना यांनी पावसाच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचे निर्देश दिले. शशी थरूर यांनी एक्स या सोशल मीडिया साईट व्हिडिओ पोस्ट करत यासंदर्भात माहिती दिली. माझे 'ल्युटन्स' दिल्लीतील घर पूर्णपणे पाण्याखाली गेलं आहे. मी आज सकाळी झोपेतून उठलो तेव्हा संपूर्ण घरात पाणी शिरलं होतं. या पाण्यामुळे बेड आणि सोफ्यासह जमिनीवर असणाऱ्या प्रत्येक गोष्टींचं नुकसान झालं.

### सरकारकडून उच्चस्तरीय बैठक आयोजित

पावसामुळे शेजारच्या नाल्यांमध्ये पाणी तुंबलं असून हे पाणी वाहून जाण्यासाठी कुठेही जागा नाही, असंही त्यांनी सांगितले. तसेच लोकांना वीजेचा धक्का लागू नये, यासाठी सकाळी ६ वाजतापासून वीज बंद करण्यात आली होती, असेही ते म्हणाले. याशिवाय आज संसदेत पोहोचण्यासाठी मला थेट बोटीने प्रवास करावा लागला असता. मात्र, साचलेलं पाणी काढण्याचं काम युद्धपातळीवर झालं, त्यामुळे मी वेळेवर संसदेत पोहोचलो, असंही त्यांनी सांगितलं.दरम्यान, आज झालेल्या पावसानंतर दिल्ली सरकारकडून आज दुपारी उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली.

# अभिनेत्री आरती छाब्रियाने दिली आनंदाची बातमी

'राजा भैय्या', 'आवारा पागल दिवाना', 'तुमसे अच्छा कौन है', 'मिलेंगे मिलेंगे' अशा चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री आरती छाब्रियाने आनंदाची बातमी दिली आहे. आरती आई झाली आहे, तिने एका महिन्याआधी गोंडस बाळाला जन्म दिला आहे. आरती ४१ व्या वर्षी आई झाली आहे. आरतीने ४ मार्च रोजी मुलाला जन्म दिला असून त्याचं नावही सांगितलं आहे. आरतीच्या पतीचं नाव विशारद बीडासी असून तो चार्टर्ड अकाउंटंट आहे. आरतीने मुलाचं नाव युवान ठेवलं आहे. तिने ती गरोदर असल्याची बातमी का लपवून ठेवली होती, याबद्दल 'हिंदुस्थान टाइम्स' शी बोलताना सांगितलं. "मला वाटत होतं की जेव्हा मला बाळाबद्दल सांगावसं वाटेल तेव्हाच मी सांगेन. आता मला सांगावसं वाटतंय. कारण माझ्या बाळाचा जन्म होऊन एक महिना झाला आहे," असं ती म्हणाली. तसेच सुरुवातीचे काही महिने आपण कपड्यांमुळे प्रेग्नेन्सी लपवली, असं तिने सांगितलं.आरती आणि तिच्या पतीने २०१९ मध्ये अरेंज मॅरेज केलं होतं. लग्नानंतर ते दोघे ऑस्ट्रेलियाला गेले आणि करोना आल्यामुळे तिथेच अडकले. "दूर राहणं तणावपूर्ण होतं, त्या परिस्थिती तुम्ही वेगवेगळ्या भावनांमधून जात असता त्यामुळे गर्भधारणा करू शकत नाही. मी नवीन ठिकाण आणि नवीन लोकांशी जुळवून घेण्यासाठी धडपडत होते, माझ्या शरीरातही खूप बदल होत होते," असं ती म्हणाली. तसेच ४१ व्या वर्षी बाळाला जन्म देणं हे विशीत किंवा तिशीत जन्म देण्याइतकं सोपं नाही, असंही तिने नमूद केलं."आधी माझा गर्भपात झाला होता, त्यामुळे यावेळी मी गर्भधारणेबद्दल न सांगायचं ठरवलं. मला उपचार घ्यावे लागले, तेव्हा मी गरोदर राहिले. बरेच लोक बोलतात ही अभिनेत्री आहे, हिच्याकडे पैसा आहे, त्यामुळे काही अडचण नाही. पण असं नसतं. हे उपचार आरोग्यावर परिणाम करतात. माझं वजन विचित्र पद्धतीने वाढलं, मला औषधांचे दुष्परिणाम जाणवत होते. औषधं घेऊनही मी गरोदर झाले नाही, शेवटी मी सर्व आशा सोडून दिल्या होत्या. पण नंतर मी गरोदर राहिले," असं आरती म्हणाली.'राजा भैय्या', 'आवारा पागल दिवाना', 'तुमसे अच्छा कौन है', 'मिलेंगे मिलेंगे' अशा चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री आरती छाब्रियाने आनंदाची बातमी दिली आहे.

## माधुरी दीक्षितच्या मनमोहक अदा

९० च्या दशकात माधुरी दीक्षितने आपल्या अभिनयासह दमदार नृत्याने सगळ्यांवर मोहिनी घातली होती. या मराठमोळ्या अभिनेत्रीने बॉलीवूडमध्ये स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण करून चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवलं. तिला बॉलीवूडची 'धकधक गर्ल' म्हणून सुद्धा ओळखलं जातं. सध्या माधुरीने इन्स्टाग्रामवर शेअर केलेला असाच एक व्हिडीओ चर्चेत आला आहे. इन्स्टाग्राम रील्सवर अनेक गाणी व्हायरल होत असतात. सध्या आशा भोसले यांचं १९८३ मध्ये प्रदर्शित झालेलं "सलोना सा सजन है...और मैं हू" या गाण्याची नेटकऱ्यांना भुरळ पडली आहे. अगदी माधुरीला सुद्धा या गाण्यावर थिरकण्याचा मोह आवरला नाही. अभिनेत्रीने नुकताच या गाण्यावर ब्लॅक अँड व्हाइट व्हिडीओ शेअर केला आहे.आशा भोसलेंच्या या जवळपास ४० वर्षे जुन्या गाण्यावर अभिनेत्रीचा मनमोहक अंदाज पाहायला मिळत आहे. माधुरीने या व्हिडीओमध्ये इंडो-वेस्टर्न लूक करत साडी नेसल्याचं पाहायला मिळत आहे. तिच्या अदाकारीची केवळ नेटकऱ्यांनाच नव्हे तर मराठी अभिनेत्रींना देखील भुरळ पडली आहे.माधुरीच्या व्हिडीओवर क्रांती रेडकरने "ओह माय गॉड तू खरंच बेस्ट आहेस" अशी कमेंट करत लक्ष वेधून घेतलं आहे. तर अमृता खानविलकरने या व्हिडीओवर कमेंट करत "उफ...ग्रेस" असं म्हटलं आहे.

## कुठे आहे मालिनी शर्मा?



डिनो मोरिया, बिपाशा बासूची या भयपटातील रोमँटिक गाणी चर्चा झाली जिचा मुख्य भूमिका असलेला 'राज' चित्रपट तुम्हाला आठवत असेल. खूप गाजली होती. डिनो आणि बिपाशा यांच्या केमिस्ट्रीची खूप होती. या सिनेमात या दोघांव्यतिरिक्त आणखी एक अभिनेत्री होती, 'मैं तुम्हें बर्बाद कर दूंगी' हा डायलॉग खूप लोकप्रिय झाला होता. ती अभिनेत्री कोण आहे व आता कुठे आहे, याबाबत जाणून घेऊयात. 'राज'मध्ये डिनो मोरिया आणि बिपाशा बसू यांच्याशिवाय अभिनेत्री मालिनी शर्मा होती. तिने भुताची भूमिका केली होती. या चित्रपटात तिची दमदार भूमिका होती. सिनेमात डिनो व मालिनीचं अफेअर दाखवण्यात आलं होतं. दोघांमध्ये खूप इंटिमेट आणि रोमँटिक सीन शूट करण्यात आले होते. विवाहित डिनो मालिनीशी लग्न करण्यास नकार देतो आणि ती गोळी मारून आत्महत्या करते. मग ती भुताच्या रुपात त्याला व बिपाशाला त्रास देते अशी चित्रपटाची कथा होती. या चित्रपटानंतर तिच्या अभिनयाची व सौंदर्याचीही खूप चर्चा झाली.मालिनीने आपल्या करिअरची सुरुवात मॉडेलिंगपासून केली होती. तिने करिअरमध्ये अनेक टीव्ही शो आणि चित्रपटांमध्ये काम केलं. याशिवाय ती बॉम्बे वायकिंगच्या 'क्या सूरत है' या गाण्यातही दिसली होती. इतकंच नाही तर अभिनेत्रीने मिका सिंगच्या 'सावन में लग गई आग' या गाण्यात काम केलं होतं.मालिनी शर्माच्या वैयक्तिक आयुष्याविषयी बोलायचं झाल्यास तिने प्रियांशू चॅटर्जीशी लग्न केलं, पण त्यांचं नातं फार काळ टिकलं नाही. चार वर्षांनंतर त्यांचा घटस्फोट झाला. आता मालिनी शर्मा कुठे आणि काय करते याबद्दल माहिती उपलब्ध नाही.डिनो मोरिया, बिपाशा बासूची मुख्य भूमिका असलेला 'राज' चित्रपट तुम्हाला आठवत असेल. या भयपटातील रोमँटिक गाणी खूप गाजली होती. डिनो आणि बिपाशा यांच्या केमिस्ट्रीची खूप चर्चा झाली होती. या सिनेमात या दोघांव्यतिरिक्त आणखी एक अभिनेत्री होती, जिचा 'मैं तुम्हें बर्बाद कर दूंगी' हा डायलॉग खूप लोकप्रिय झाला होता. ती अभिनेत्री कोण आहे व आता कुठे आहे, याबाबत जाणून घेऊयात. 'राज'मध्ये डिनो मोरिया आणि बिपाशा बसू यांच्याशिवाय अभिनेत्री मालिनी शर्मा होती. तिने भुताची भूमिका केली होती. या चित्रपटात तिची दमदार भूमिका होती. सिनेमात डिनो व मालिनीचं अफेअर दाखवण्यात आलं होतं. दोघांमध्ये खूप इंटिमेट आणि रोमँटिक सीन शूट करण्यात आले होते.

## जॅकी श्रॉफ यांचा व्हिडीओ होतोय तुफान व्हायरल

आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे, वेगळ्या अंदाजामुळे, स्टाइलमुळे ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ नेहमी चर्चेत असतात. त्यांची स्टाइल चाहत्यांना खूप आवडते. सध्या जॅकी श्रॉफ यांचा एक व्हिडीओ तुफान व्हायरल होतं आहे. या व्हिडीओमधील जॅकी श्रॉफ यांची कृती पाहून नेटकरी भडकले आहेत. त्यांना ट्रोल करत आहेत. जॅकी श्रॉफ यांचा व्हायरल व्हिडीओ 'इंस्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. एका कार्यक्रमासाठी जॅकी श्रॉफ दोन झाडं घेऊन जात होते. तितक्यात त्यांचे चाहते फोटो घेण्यासाठी त्यांच्याकडे धावले. जॅकी श्रॉफ यांनी सगळ्या चाहत्यांबरोबर फोटो काढले. पण यावेळी त्यांनी चाहत्यांना दिलेल्या वागणुकीने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं.या व्हिडीओत, जॅकी श्रॉफ फोटो काढण्यात आलेल्या चाहत्याला डोक्यात मारताना दिसत आहेत. तसेच इतरांना दम देताना पाहायला मिळत आहेत. जॅकी श्रॉफ यांनी चाहत्यांना दिलेल्या या वागणुकीवरून नेटकरी भडकले आहेत.एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, "त्याला मारलं का? वेडेत आहेत का?" तर दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हे खूप चुकीचं आहे. तुम्ही कोणालाही मारू शकत नाही. चाहते तुमचे मित्र किंवा नातेवाईक नाहीत, ज्यांच्याबरोबर तुम्ही मस्ती कराल." तसेच तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हात लावला तर काय झालं? एवढा गर्व नाही पाहिजे." चौथ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हे चुकीचं आहे. सामान्य माणसांना हे आदर देत नाहीत."सध्या जॅकी श्रॉफ यांच्या या व्हिडीओची चांगलीच चर्चा सुरू आहे. पण काही नेटकरी त्यांना आलेले जॅकी श्रॉफ यांचे चांगले अनुभव शेअर करत आहेत.आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे, वेगळ्या अंदाजामुळे, स्टाइलमुळे ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ नेहमी चर्चेत असतात. त्यांची स्टाइल चाहत्यांना खूप आवडते. सध्या जॅकी श्रॉफ यांचा एक व्हिडीओ तुफान व्हायरल होतं आहे. या व्हिडीओमधील जॅकी श्रॉफ यांची कृती पाहून नेटकरी भडकले आहेत. त्यांना ट्रोल करत आहेत. जॅकी श्रॉफ यांचा व्हायरल व्हिडीओ 'इंस्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. एका कार्यक्रमासाठी जॅकी श्रॉफ दोन झाडं घेऊन जात होते. तितक्यात त्यांचे चाहते फोटो घेण्यासाठी त्यांच्याकडे धावले. जॅकी श्रॉफ यांनी सगळ्या चाहत्यांबरोबर

## रकुल प्रित सिंहने केली खास पोस्ट



लातूर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख यांचा आज वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अभिनेत्री रकुल प्रित सिंगनेही धिरज यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तिने तिच्या व जॅकीच्या लग्नसोहळ्यातील एक खास फोटो शेअर करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. रितेश देशमुखचे भाऊ धिरज यांची पत्नी दिपशिखा ही रकुल प्रितची सख्खी नणंद आहे. रकुल व जॅकी यांचं फेब्रुवारी महिन्यात गोव्यात लग्न झालं. लग्नाच्या कार्यक्रमातील एक फोटो रकुलने शेअर केला आहे. या फोटोत रकुल व धिरज देशमुख डान्स करताना दिसत आहेत. 'वाढदिवसाच्या शुभेच्छा, येणारं वर्ष आनंदाचं जावो आणि या वर्षात तुम्हाला हवं ते सर्व मिळो,' असं रकुलने या फोटोत धिरज देशमुखांना टॅग करत लिहिलं.रकुल व जॅकीचं लग्न २१ फेब्रुवारी रोजी गोव्यात झालं. मेहुण्याच्या लग्नासाठी धिरज देशमुख गोव्याला गेले होते. त्यांची पत्नी दिपशिखा व मुलं सर्वजण या लग्नासाठी काही दिवस गोव्यात होते.

# माहीच्या 'हेअर स्टाइल'ने वेधले लक्ष

## फोटो पाहून चाहते म्हणाले, 'काही दिवसात तो 43 वर्षांचा होईल

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीने भलेही क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असेल, पण त्याची खास शैली आणि लूक त्याला चर्चेत ठेवतात. आता एक अतिशय लोकप्रिय हेअर स्टायलिस्ट अलीम हकीमने सोशल मीडियावर एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये माहीने त्याचे लांब केस कापलेले दिसत आहेत. ज्यामुळे धोनीला एक नवीन आणि मस्त लूक मिळाल्याचे दिसत आहे.**





काही काळापूर्वी आयपीएल २०२४ मध्ये धोनी लांब केसांच्या लूकमध्ये खेळताना दिसला होता, परंतु आता नवीन हेअरकटमुळे धोनी एखाद्या मॉडेलपेक्षा कमी दिसत नाही. हेअर स्टायलिस्ट अलीम हकीमने धोनीच्या फोटोसोबत कॅप्शनमध्ये लिहिले, "आमचा तरुण, डायनॅमिक आणि देखणा महेंद्रसिंग धोनी. थालाचे हेअर स्टाईल करणे हा एक आनंददायी अनुभव आहे. धोनी नेहमीच इतका विनम्र असतो की तो मला फोटो काढायला कधीच मनाई करत नाही."काही आठवड्यांपूर्वी रांची येथील त्याच्या फार्महाऊसमध्ये आराम करताना दिसला होता. त्यावेळी समोर आलेल्या फोटोंमध्येही धोनीचे केस लांब होते, मात्र आता त्याने केसांची लांबी थोडी कमी केली आहे. कमेंट सेक्शनमध्ये एका चाहत्याने लिहिले की, 'धोनी काही दिवसात ४३ वर्षांचा होईल यावर विश्वास बसत नाही. खरंतर धोनी अजूनही खूप तरुण दिसतो.'आयपीएल २०२४ मध्ये धोनीच्या दमदार कामगिरीनंतर धोनी पुढच्या हंगामात खेळणार की नाही हे जाणून घेण्याची चाहत्यांना उत्सुकता असेल. नुकत्याच झालेल्या हंगामात, त्याने सीएसकेचे कर्णधारपद ऋतुराज गायकवाडकडे सोपवले, जो संघाला प्लेऑफमध्ये नेऊ शकला नाही. आयपीएल २०२४ मध्ये धोनीने २२० च्या स्ट्राईक रेटने खेळताना १६१ धावा केल्या आणि भरपूर षटकार मारून प्रेक्षकांचे मनोरंजनही केले. धोनीने अद्याप निवृत्तीबाबत कोणतीही घोषणा केली नसल्यामुळे धोनी जर तंदुरुस्त राहिला तर तो आयपीएल २०२५ मध्ये नक्कीच खेळताना दिसेल, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.काही काळापूर्वी आयपीएल २०२४ मध्ये धोनी लांब केसांच्या लूकमध्ये खेळताना दिसला होता, परंतु आता नवीन हेअरकटमुळे धोनी एखाद्या मॉडेलपेक्षा कमी दिसत नाही. हेअर स्टायलिस्ट अलीम हकीमने धोनीच्या फोटोसोबत कॅप्शनमध्ये लिहिले, "आमचा तरुण, डायनॅमिक आणि देखणा महेंद्रसिंग धोनी. थालाचे हेअर स्टाईल करणे हा एक आनंददायी अनुभव आहे. धोनी नेहमीच इतका विनम्र असतो की तो मला फोटो काढायला कधीच मनाई करत नाही."काही आठवड्यांपूर्वी रांची येथील त्याच्या फार्महाऊसमध्ये आराम करताना दिसला होता. त्यावेळी समोर आलेल्या फोटोंमध्येही धोनीचे केस लांब होते, मात्र आता त्याने केसांची लांबी थोडी कमी केली आहे. कमेंट सेक्शनमध्ये एका चाहत्याने लिहिले की, 'धोनी काही दिवसात ४३ वर्षांचा होईल यावर विश्वास बसत नाही. खरंतर धोनी अजूनही खूप तरुण दिसतो.'आयपीएल २०२४ मध्ये धोनीच्या दमदार कामगिरीनंतर धोनी पुढच्या हंगामात खेळणार की नाही हे जाणून घेण्याची चाहत्यांना उत्सुकता असेल. नुकत्याच झालेल्या हंगामात, त्याने सीएसकेचे कर्णधारपद ऋतुराज गायकवाडकडे सोपवले, जो संघाला प्लेऑफमध्ये नेऊ शकला नाही. आयपीएल २०२४ मध्ये धोनीने २२० च्या स्ट्राईक रेटने खेळताना १६१ धावा केल्या आणि भरपूर षटकार मारून प्रेक्षकांचे मनोरंजनही केले. धोनीने अद्याप निवृत्तीबाबत कोणतीही घोषणा केली नसल्यामुळे धोनी जर तंदुरुस्त राहिला .

### आयपीएल 2024 मध्ये खेळणार?

तर तो आयपीएल २०२५ मध्ये नक्कीच खेळताना दिसेल, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीने भलेही क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असेल, पण त्याची खास शैली आणि लूक त्याला चर्चेत ठेवतात. आता एक अतिशय लोकप्रिय हेअर स्टायलिस्ट अलीम हकीमने सोशल मीडियावर एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये माहीने त्याचे लांब केस कापलेले दिसत आहेत. ज्यामुळे धोनीला एक नवीन आणि मस्त लूक मिळाल्याचे दिसत आहे. काही काळापूर्वी आयपीएल २०२४ मध्ये धोनी लांब केसांच्या लूकमध्ये खेळताना दिसला होता, परंतु आता नवीन हेअरकटमुळे धोनी एखाद्या मॉडेलपेक्षा कमी दिसत नाही. हेअर स्टायलिस्ट अलीम हकीमने धोनीच्या फोटोसोबत कॅप्शनमध्ये लिहिले.

# शफाली वर्माचं तडाखेबंद विक्रमी द्विशतक

## स्मृतीचं शतक, टीम इंडियाचा आफ्रिकेविरुद्ध धावांचा डोंगर

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वनडे मालिकेत वर्चस्व गाजवल्यानंतर भारतीय महिला क्रिकेट संघाने चेन्नईत सुरू असलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकमेव कसोटीचा पहिला दिवस शफाली वर्माने गाजवला. भारतासाठी द्विशतकी खेळी साकारणारी ती केवळ दुसरी खेळाडू ठरली आहे. याआधी मिताली राजने इंग्लंडविरुद्ध २००२ मध्ये टाँटन इथे २१४ धावांची खेळी केली होती.**




स्मृती-शफाली जोडीने महिला क्रिकेटमध्ये सर्वोत्तम सलामीचा पाकिस्तानच्या किरण बलूच आणि साजिदा शाह यांचा २० वर्षांपूर्वीचा २४१ धावांचा विक्रम मोडला. स्मृती-शफाली जोडीने ३१२ चेंडूतच २९२ धावांची भागीदारी केली. या जोडीने भारतीय महिला क्रिकेटमधला सर्वोत्तम सलामीचा त्यांचाच विक्रमही मोडला.हरयाणा हरिकेन नावाने प्रसिद्ध शफाली वर्माने आफ्रिकेच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत द्विशतकी खेळी साकारली. शफालीच्या बॅटचा तडाखा सुरू असतानाच स्मृती मानधनाने देखणी शतकी खेळी साकारली. शफालीच्या वादळी खेळीच्या बळावर भारतीय संघाने ७३व्या षटकातच ४०० धावांची वेस ओलांडली आहे. डेल्मी टकरच्या गोलंदाजीवर दोन खणखणीत षटकारांनंतर एकेरी धाव घेत शफालीने पहिल्यावहिल्या ऐतिहासिक द्विशतकाला गवसणी घातली. शफालीच्या २०५ धावांच्या खेळीत २३ चौकार आणि ८ षटकारांचा समावेश आहे. स्मृतीने २७ चौकार आणि एका षटकारासह १४९ धावांची सुरेख खेळी केली. शफाली-स्मृतीच्या भागीदारीसमोर दक्षिण आफ्रिकेचे गोलंदाज निरुत्तर ठरले. या दोघींनी २९२ धावांची सलामी दिली. महिला क्रिकेटसाठी पहिल्या विकेटसाठीची ही सर्वोत्तम भागीदारी आहे.

### शफालीच्या 205 धावा

स्मृती-शफाली जोडीने महिला क्रिकेटमध्ये सर्वोत्तम सलामीचा पाकिस्तानच्या किरण बलूच आणि साजिदा शाह यांचा २० वर्षांपूर्वीचा २४१ धावांचा विक्रम मोडला. स्मृती-शफाली जोडीने ३१२ चेंडूतच २९२ धावांची भागीदारी केली. या जोडीने भारतीय महिला क्रिकेटमधला सर्वोत्तम सलामीचा त्यांचाच विक्रमही मोडला.हरयाणा हरिकेन नावाने प्रसिद्ध शफाली वर्माने आफ्रिकेच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत द्विशतकी खेळी साकारली. शफालीच्या बॅटचा तडाखा सुरू असतानाच स्मृती मानधनाने देखणी शतकी खेळी साकारली. धाव घेत शफालीने पहिल्यावहिल्या ऐतिहासिक द्विशतकाला गवसणी घातली. शफालीच्या २०५ धावांच्या खेळीत २३ चौकार आणि ८ षटकारांचा समावेश आहे.